देशोन्नती दि. २२/१०/...

# चोरी करणारे ५ आरोपी स्थागुशाच्या जाळयात

## १ लाख ९० हजाराचा मुद्देमाल जप्त

### मोटारसायकल, नगदी रक्कमेसह



...किरण...

...कौठा मार्गावर खंजरचा ...दोघांना लुटणाऱ्या ...स्थागुशाच्या पथकाने ...आवळल्या असून ...नगदी रक्कम, दोन ...मोबाईल असा एकुण ...९० हजार १०० रुपये ...मुद्देमाल जप्त केला.

...कौठा नांदेड येथे मार्गावरुन ...एका इसमास अज्ञात ...तांनी खंजरचा धाक दाखवुन ...अंगठी व नगदी रुपये जबरीने ...नेते होते. सदर प्रकरणी पोलीस ...नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात ...दाखल होता. तसेच लातूर फाटा ...मार्गावरील अज्ञात आरोपीतांनी ...का इसमास खंजरचा धाक दाखवून ...नगदी रुपये जबरी चोरी करुन त्यास ...गंभीर दुखापत केली होती त्या प्रकरणीही गुन्हे दाखल होते. नमुद दोन्ही गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेवुन अटक करण्याबाबत पोलिस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांनी स्थागुशा यांना आदेशीत केले होते. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथके हे २१ ऑक्टोबर रोजी नांदेड शहरात पेट्रोलींग करीत असताना, गुप्त बातमीदारामार्फत कौठा येथील रॉबरी मधील आरोपी असदवन येथे असल्याची माहिती मिळाली.या माहितीवरून पथकाने असदवन येथे जावुन आतिष ठाकुर (२२) रा. असदवन यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने व त्याचे साथीदार श्याम ऊर्फ शाम्या सोनटक्के (२२) रा.हनुमानमंदीर जवळ, जुना कौठा, राहुल ऊर्फ सोन्या राऊत( २५) रा.नवजिवननगर, छत्रपतीचौक, करण भोकरे (२३) रा. बुध्दविहारजवळ जुना कौठा, सुनिल ऊर्फ सोन्या गायकवाड (२०) वर्ष रा. जुना कौठा यांनी मिळून गुन्हे केल्याचे कबुल केले व त्यांचे साथीदार कौठा नांदेड येथे असल्याबाबत सांगीतले.या आरोपींना कौठा नांदेड येथुन ताब्यात घेवुन नमुद सर्व आरोपीतांकडुन दोन्ही गुन्हयातील सोन्याची अंगठी नगदी रुपये, दोन मोटार सायकल,एक मोबाईल असा एकुण १ लाख ९० हजार १०० रुपयाचा माल जप्त करण्यात आला आहे. यातील सर्व आरोपीतांना पुढील तपासकामी पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे.या पथकात पोनि द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पांडुरंग माने, पोउपनि जसंवतसिंघ शाहु, सपोउपनि मारोती तेलंग, पोना विठ्ठल शेळके, मोतीराम पवार, तानाजी येळगे, बजरंग बोडके, महेश बडगु, चामोकों बिचकेवार यांचा समावेश होता.

पुण्यनगरी दि. 22/10/2022

# जबरी चोरीतील ५ आरोपींकडून दोन लाखांचा ऐवज जप्त

**नांदेड/प्रतिनिधी**

शहरात जबरी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. या पार्श्वभुमीवर स्थानिक गुन्हा शाखेचे पथक चोरट्यांच्या शोधात असताना गुप्त माहितीवरुन ५ चोरट्यांना जेरबंद करुन त्यांच्याकडून १ लाख ९० हजार १०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांनी शहर व परिसरात जबरी चोरीच्या घटना वाढल्यामुळे या आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी वेगवेगळ्या पथकांची स्थापना करुन आरोपींना शोधण्याचे आदेश दिले होते. स्थानिक गुन्हा शाखेचे पथक २१ ऑक्टोबर २०२२ रोजी पेट्रोलिंग करीत असताना त्यांना चोरट्याबाबत गुप्त माहिती मिळाली. त्यावरुन कौठा येथील जबरी चोरीतील आरोपी असदवन येथे आहेत.

पथकाने असदवन येथून आतीष जीवनसिंग ठाकुर (२२, व्यवसाय बेकार रा. असदवन ता. जि. नांदेड) यास स्थागुशाच्या पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्याने त्याचे साथीदार श्याम ऊर्फ शाम्या मोजाजी सोनटक्के (२२, व्यवसाय बेकार रा. हनुमानमंदीर जवळ, जुना कौठा नांदेड), राहुल ऊर्फ सोन्या पिता रमेश राऊत (२५, व्यवसाय बेकार रा. नवजिवननगर, छत्रपतीचौक, नांदेड), करण अशोक भोकरे (२३, व्यवसाय बेकार रा. बुध्दविहारजवळ जुना कौठा नांदेड), सुनिल ऊर्फ सोन्या अशोक गायकवाड (२०, व्यवसाय बेकार रा. जुना कौठा, नांदेड) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत गु.र.नं ६२७/२२ व गु.र.नं.६३५/२२ या गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली.

या आरोपींना ताब्यात घेऊन वरील गुन्ह्यातील सोन्याची अंगठी, नगदी रोकड व २ दुचाकी, एक मोबाईल असा एकुण १ लाख ९० हजार १०० रुपये किंमतीचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. या आरोपींना पुढील तपासासाठी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. या आरोपींकडुन आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, सपोनि पांडुरंग माने, पोउपनि जसंवतसिंघ शाहु, सपोउपनि मारोती तेलंग, पोना विठ्ठल शेळके, मोतीराम पवार, तानाजी येळगे, बजरंग बोडके, महेश बडगु, चामोकों बिचकेवार यांनी ही कारवाई केली. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी या पथकाचे कौतुक केले आहे.